आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता

२८ सप्टेंबर २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी अधिकाधिक मतदारांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्याचं निवडणूक आयोगाचं आवाहन

- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते कोल्हापूरातून मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेला सुरुवात

- पिंपरी चिंचवड, पनवेल, सातारा शहरांना माझी वसुंधरा अभियानात विविध श्रेणीत प्रथम पुरस्कार

**आणि**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवरुन मन की बातद्वारे नागरिकांशी संवाद साधणार

**<><><><><>**

राज्यातल्या आगामी विधानसभा निवडणुकीत अधिकाधिक मतदारांनाही सहभागी व्हावं आणि मतदानाची टक्केवारी वाढवावी असं आवाहन केंद्रीय निवडणूक आयोगानं आज मुंबईत केलं. त्यासाठी विविध शहरांमध्ये विशेष मोहिम राबवली जाणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेतल्यानंतर मुंबईत वार्ताहर परिषदेत मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी ही माहिती दिली. मतदान केंद्रावर मतदारांना अधिकाधिक सुविधा देण्यात याव्या असे आदेश दिले आहेत. त्यासाठी एका मतदान केंद्रावर सरासरी ९५० मतदार असतील याची काळजी घेतल्याचं त्यांनी सांगितलं. राज्यातल्या यंदा १ लाखांहून अधिक मतदान

केंद्र असतील. शहरी भागातल्या जवळपास १०० टक्के आणि ग्रामीण भागातल्या ५० टक्के मतदान केंद्रावर web casting सुविधा दिली जाणार आहे. यावेळी १ हजार १८१ मतदान केंद्र ही उंच इमारतीमध्ये आणि २१० झोपडपट्टी मध्ये असणार आहेत. आजूबाजूच्या राज्यातून अवैधरीत्या होणारी रोख रक्कम, अंमली पदार्थ, मद्य आणि इतर वस्तूंची वाहतूक रोखण्यासाठी ३२२ चेक पोस्ट निर्माण करण्याचे आदेश दिल्याची माहिती त्यांनी दिली.

निवडणूक आयोगानं या दौऱ्यात राज्यातल्या ११ पक्षांशी चर्चा केली. दिवाळी, देव दिवाळी आणि इतर सण ध्यानात घेऊन निवडणुकांची तारीख निश्चित करावी. सुटीच्या दिवसाला लागून मतदानाचा दिवस येणार नाही याची खबरदारी घेण्याची मागणी या पक्षांनी केल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त म्हणाले.

३ वर्षांपेक्षा अधिक काळ एकाच ठिकाणी असलेल्या किंवा गृह जिल्ह्यात कार्यरत असलेल्या सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची तत्काळ बदली करावी आणि त्याचा अहवाल निवडणूक आयोगाला पाठवण्याच्या स्पष्ट सूचना मुख्य सचिवांना दिल्याचंही ते म्हणाले. निवडणुकीच्या काळात मतदारांना प्रलोभनं दाखवली जाऊ नये यासाठी विशेष लक्ष दिलं जाणार आहे. एटीएममध्ये पैसे भरणारी वाहनं सूर्यास्तानंतर काम करणार नाहीत. तसंच ऑनलाइन पैसे हस्तांतरणात अचानक काही वेगळ्या घडामोडी दिसून आल्या तर तत्काळ कळवण्याच्या सूचना बँकांना दिल्या आहेत, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महायुतीकडून सन्मानपूर्वक जागा मिळाल्या नाहीत, तर युतीतून बाहेर पडून सर्व २८८ जागांवर निवडणूक लढवू, अशी घोषणा राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी केली आहे. नाशिक दौऱ्यावर असलेल्या जानकर यांनी

प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली. महायुतीकडून ३५ ते ४० जागांची अपेक्षा असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज कोल्हापुरातून मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचा राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला. मुख्यमंत्र्यांनी दूरदृश्य प्रणालीमार्फत या योजनेतल्या पहिल्या कोल्हापूर ते अयोध्या या रेल्वेगाडीला हिरवा झेंडा दाखवला. या पहिल्या रेल्वेगाडीतून ८०० ज्येष्ठ नागरिक रवाना झाले असून आपली वडीलधारी मंडळी ही आपली जबाबदारी असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

नवी मुंबईतल्या तळोजा इथं तयार होत असलेली वकील अकादमी आणि संशोधन केंद्र न्यायदानाच्या विविध क्षेत्रांमध्ये उत्तम काम करेल. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर या क्षेत्रात वाढतो आहे. हे सगळे बदल वकिलांपर्यंत पोहोचवण्याचं कामही अशा अकादमींच्या माध्यमातून होईल, असं प्रतिपादन  उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. महाराष्ट्र आणि गोवा वकील परिषदेच्या पुढाकारानं उभारण्यात येणार असलेल्या वकील अकादमी आणि संशोधन केंद्राचं भूमिपूजन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी ते बोलत होते. या अकादमीसाठी दहा कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणा त्यांनी केली.

**<><><><><>**

नागपुरातील ऑक्सिजन पक्षी उद्यानाच्या माध्यमातून नागरिकांना परिसंस्था आणि पर्यावरणाचे महत्त्व लक्षात येईल. असं  केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटलं आहे. ते आज नागपूरच्या वर्धा रोड वरील जामठा इथं उभारण्यात आलेल्या पक्षी उद्यानाच्या उद्घघाटन प्रसंगी बोलत होते.

**<><><><><>**

राज्यात १ एप्रिल ते ३१ मे दरम्यान राबवण्यात आलेल्या माझी वसुंधरा अभियाना अंतर्गत दहा लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या मोठ्या शहरांच्या अमृत गटात पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रथम, नवी मुंबई द्वितीय तर ठाणे महानगरपालिका तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली आहे. तसंच भूमी थीमॅटिक कॅटेगिरीत नवी मुंबई महानगरपालिका राज्यात सर्वोत्तम ठरली आहे. ३ ते १० लाख लोकसंख्या असलेल्या गटात पनवेल महानगरपालिकेने प्रथम, अहमदनगर द्वितीय तर धुळे महानगरपलिकेने तृतीय क्रमांक पटकावला आहे. या गटात सोलापूर महानगरपालिकेने सर्वोत्तम कामगिरी केली आहे. १ ते ३ लाख लोकसंख्या असलेल्या गटात सातारा नगर परिषद पहिली, यवतमाळ दुसरी तर इचलकरंजी तिसरी आली आहे.

नगरपरिषद आणि नगरपंचायत गटात बारामतीनं प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर हिंगोली आणि पंढरपूरने अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवला आहे. तसंच लोणावळा नगरपरिषदेनं उत्तेजणार्थ क्रमांक पटकावला आहे.

<><><><><>

माझी वसुंधरा अभियाना अंतर्गत सांगली जिल्हा परिषद राज्यात प्रथम क्रमांकाची मानकरी ठऱली आहे. तर अहमदनगरने द्वितीय आणि नाशिक जिल्हा परिषदेने तृतीय क्रमांक पटकावला आहे. सांगली जिल्ह्यातल्या सोळा ग्रामपंचयातींनीही लक्षणीय यश मिळवलं आहे.

**माझी वसुंधरा अभियाना अंतर्गत** विभागस्तरावर सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषदांचीही घोषणा करण्यात आली आहे. यात अमरावती विभागात बुलडाणा, छत्रपती संभाजीनगर विभागात छत्रपती संभाजीनगर, कोकण विभागात रायगड, नागपूर विभागात गोंदिया, नाशिक विभागात जळगाव, पुणे विभागात कोल्हापूर या जिल्हा परिषदांचा समावेश आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुण्यातल्या शिवाजीनगर ते स्वारगेट या भुयारी मेट्रो मार्गाचं उद्या दूरदृश्य प्रणालीद्वारे लोकार्पण होणार आहे. स्वारगेट ते कात्रज या भुयारी मार्गाचं भूमीपूजनही यावेळी होणार आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या, २९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता आकाशवाणीवर ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशविदेशातल्या नागरिकांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा ११४ वा भाग असेल. हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, आकाशवाणी वृत्त संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एआयआर या ॲपवर प्रसारित केला जाईल.

<><><><><>

मुंबई महानगराची स्वच्छता करून लोकांचं आरोग्य निरोगी ठेवण्यात स्वच्छता मित्रांचा मोलाचा वाटा आहे, असे गौरवोद्गार मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी काढले. स्वच्छता ही सेवा या अभियाना अंतर्गत मुंबई महानगरपालिकेच्या २४ विभागात विशेष स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यात आयुक्त गगराणी यांच्यासह इतर अधिकारी सहभाही झाले. यावेळी गगराणी बोलत होते. आज मुंबईत महाविद्यालयीन आणि शालेय विद्यार्थ्यांनी स्वच्छतेविषयी जनजागृती केली.

<><><><><>

‘स्वच्छता ही सेवा’ अभियान सध्या सर्वत्र सुरू आहे. या अभियानाविषयी अभिनेत्री ऋजुता देशमुख यांनी आकाशवाणीला सांगितलं….

**होल्ड --- बाईट…ऋजुता देशमुख (३० सेकंद)**

<><><><><>

महिलांनी खंबीर व्हायला हवं असं मत एसएनडीटी विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. उज्वला चक्रदेव यांनी व्यक्त केलं आहे. त्या नवी मुंबईच्या सानपाडा इथं आज झालेल्या एक दिवसीय महिला साहित्यिक संमेलनात बोलत होत्या. अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत या संमेलनात महिला साहित्यिकांचे विविध परिसंवाद, चर्चासत्रं आणि वृंदा टिळक यांचं व्याख्यान असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. यावेळी अनेक महिला साहित्यिक, रसिक उपस्थित होते.

<><><><><>

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री रोहिदास पाटील यांच्या पार्थिवावर आज दुपारी धुळ्यातल्या SSVPS महाविद्यालयाच्या मैदानावर शासकीय इतमामात अत्यंसंस्कार करण्यात आले. पोलीस पथकाने बंदुकीच्या तीन फैरी झाडून पाटील यांना मानवंदना दिली. राज्याच्या विविध भागातून राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच विविध क्षेत्रातले मान्यवर उपस्थित होते.

<><><><><>

भारत आणि बांगलादेश यांच्यातल्या कसोटी क्रिकेट मालिकेतल्या दुसऱ्या आणि अंतिम सामन्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशीचा खेळ पावसामुळे रद्द झाला. काल पावसामुळं खेळ थांबला तेव्हा बांग्लादेश ३ गडी बाद १०७ धावांवर खेळत होता.

<><><><><>

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. याकाळात, कोकणात तुरळक ठिकाणी जोरदार तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वेधशाळेनं वर्तवली आहे.

//<><><><><>//